Research Papers

समाजातील पोलीस प्रतिमा मलिन होण्याची कारणे व उपाययोजना

Shekhar B.G.
Research Scholar
Dy.Commissionar Mumbai Crime Branch.

प्रास्तविक

भारतीय घटनेला अनुसरुन भारतातील राज्यकारभार पध्दती आखली गेली आहे. भारतीय जनतेने निधर्मी, समाजवादी, सार्वभौम अशी लोकशाही प्रणाली निश्चित केली आहे.

भारतीय लिखित घटना 26 जानेवारी 1950 साली अंमलात आली. घटनेमध्ये कायदेमंडळ, न्यायमंडळ, कार्यकारी मंडळ (सरकारी अधिकारी) यांच्या कार्याचा बारकाईने विचार केला आहे. घटनेमध्ये केंद्र व राज्य पातळीवर विषयांचा अभ्यास केलेला आहे. यात प्रशिक्षण, आरोग्य, स्थानिक कर, शेती, जंगल, दळणवळण, तार खाते, बॅक, चलन, निर्यात इत्यादी विषयाप्रमाणे पोलीस हा सुध्दा एक महत्वाचा विषय आहे. त्याचा समावेश राज्यसुचित केलेला आहे.

साधारणतः समाजात सुव्यवस्था ठेवून कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम पोलीसांचे आहे असे समजले जाते. 'पोलीस' या शब्दाचा बोली अर्थ सर्वसाधारणपणे कायद्याची अंमलबजावणी करुन समाजात सुव्यवस्था ठेवणे, साठी सरकारने नेमणुक केलेला शासकीय कर्मचारी वर्ग असा होतो.

समाजात सुव्यवस्था नांदविणे, जनतेचे संरक्षण करणे आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे हे उद्देश समोर ठेवून पोलीस खात्याच्या कार्याचे धोरण आखले जाते. 'पोलीसांची भुमिका' ही पोलीस कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि कार्यात सामावलेली आहे.

पोलीस यंत्रणा हा समाजातील एक अविभाज्य घटक आहे. समाजातील मुलभूत अंगांपैकी ते एक महत्वाचे अंग आहे. पोलीस यंत्रणा ही एक समाजातील महत्वाची संस्था आहे. तरीसुध्दा पोलीस म्हटले की, 'उनसे ना दोस्ती अच्छी ना दुश्मनी' असाच एक सर्वसामान्यपणे लोकांचा समज आहे. लोकांची पोलीसाबद्दलची प्रतिक्रिया थोडया फार फरकाने याच प्रकारची असून बहुतेक वेळी त्यांच्या कपाळावर पोलीसांचे नांव घेताच आठया पडतात. पोलीसांबद्दल लोकांमध्ये सहानुभूती ऐवजी गैरसमजच जास्त पहायला मिळतात.

तसे पाहता पोलीसांचा भुमिका (रोल) समाजामध्ये फार महत्वाचा आहे. त्यांना नाना प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. कधी व्यक्ती, कधी समाज, कधी अधिकारी, कधी राजकारण तर कधी राजकारणी या सर्वांना सामोरे जात त्यांना आपले कर्तव्य 24 तास बजावत रहावे लागते. त्याबरोबरच त्यांना वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व न्यायालयीन अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पोलीस ज्यावेळी आपली कर्तव्ये बजावत असतात तेव्हा त्यांना प्रखर टिकांनाही तोंड द्यावे लागते.

पोलीस कर्मचाऱ्यांची सामाजिक भुमिका खालील प्रकारची असते.

1) जनतेस कायद्याचे पालन करण्यास भाग पाडणारा
2) गुन्हेगाराला योग्य शासन करणारा व जनतेला न्याय देणारा
3) जनतेची निरंतर सेवा करणारा
4) राज्यव्यवस्थेचा प्रतिनिधी
5) कायद्याचा अंमल बसवून समाजात शांतता व सुव्यवस्था स्थापन करणारा
6) न्यायालयीन प्रक्रियेत न्याय प्रक्रियेचा मुलभूत घटक म्हणून काम करणारा

परंतु, त्याबद्दल त्यांना कोणीही शाबासकी देत नाही, गुन्हेगाराला शासन करण्याच्या कामात पोलीसांचे कार्य महत्वाचे असल्यामुळे त्यांना या कामाबद्दल जबाबदार धरले जाते. या सर्व अडचणीमधून पोलीसांना निर्णय घ्यावे लागतात. या गोष्टींचा सर्व बाजुंनी विचार होणे.

या सर्व बाबींचा अभ्यास सखोलपणे होण्याची अत्यंत गरज

आहे. सामाजिक कल्याणाकरिता अशाप्रकारच्या संशोधनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. यावर अभ्यास झाल्यास नक्कीच समाजामध्ये सकारात्मक बदल होतील. पोलीस प्रतिमा वाईट करणारी साधने व घटक व त्यावर निश्चित उपाययोजना हवी.

समाजात पोलीसांची प्रतिमा चांगली आहे का वाईट याचे प्रमाण काढले तर वाईटाकडे जास्त पारडे झुकते. हे असे का?याची कारणे शोधणे गरजेचे आहे. ही अशी प्रतिमा निर्माण होण्यामागे पोलीस जबाबदार आहेत की, समाज जबाबदार आहे याचा अभ्यास होणे सामाजिक गजर आहे.

पोलीस प्रशासनाकडे पहाण्याचे दोन दृष्टीकोन :

1) मार्क्सवादी दृष्टीकोन :

पोलीसांकडे बघण्याचे समाजाचे दृष्टीकोन कोणते व कशा प्रकारचे आहेत हे पहाणे महत्वाचे आहे. मार्क्सवदी दृष्टीकोनाप्रमाणे पोलीस हे श्रीमंतांचे, बडया शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे, भांडवलदारांचेच हितसंबंध जपणारे नसावेत. तर पोलीस हे समाजातील सर्व स्तरावरील जनतेसाठी समान न्याय देणारे असावे. तेथे गरीब–श्रीमंत, उच्च–नीच, जातीयवाद, भेदभाव या घटकांना थारा नसावा. त्यामुळे राजकारण्यांना, श्रीमंतांना, भांडवलदारांना कायदा हातात घेऊन समाजात अराजकता माजवता येणार नाही.

2) आधुनिक कल्याणकारी लोकशाही दृष्टीकोन :

भारत देशाने लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. येथे भांडवलशाहीला थारा नाही तर आपल्या राज्यघटनेमध्ये सार्वभौमत्व, समानता, स्वायत्व, समता, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता या गोष्टींचा सहभाग असल्याने आपल्याकडे कायद्यापुढे समानता सर्व थरातील जनतेला समान कायदा, समान न्याय आहे. आपली राज्यसंस्था ही लोकांचे कल्याण करणारी संस्था आहे.

आधुनिक कल्याणकारी लोकशाही राज्यसंस्थेमध्ये पोलीसांची भुमिका काय राहील?याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. पोलीसांची भुमिका निरपेक्ष, धर्मनिरपेक्षवादी, उच्च–नीच भेदभाव न करणारी जातीयवाद व राजकीस हितसंबंध जपणारी नसावी. राज्यसंस्था समाजामध्ये दंगल मिटविणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, गुन्हेगारांवर अंकुश ठेवणे, गुन्हेगारी कमी करणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हयांना प्रतिबंध करणे इ. व अनेक प्रकारच्या सेवा पोलीसांमार्फत जनतेला, समाजाला पुरवते.

पोलीसांची प्रतिमा मलिन होण्याची कारणे :–

1) चित्रपट माध्यम, दूरदर्शन (T.V.) :– चित्रपटांव्दारे पोलीसांची प्रतिमा मलिन केली जाते किंवा पोलीस कर्मचारी वेंधळे, बावळट, लाचखोा, बेशिस्त असल्याचे दाखवितात. पोलीसांची चित्रपटात टिंगलटवाळी केली जाते. त्यामुळे सर्वसाधारणपणे पोलीसांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन तसाच रहातो. बऱ्याच वेळा चित्रपटांमधून पोलीस गुन्हेगारांना मदत करणारे, त्यांच्या पाठीशी राहणारे दाखवितात व त्यामुळे पोलीस प्रतिमा मलिन होते. त्यास पोलीसांना कायदा व नियमांच्या बंधनामुळे प्रत्युत्तर देत येत नाही. त्यामुळे समाजापुढे पोलीसांची एकच बाजू येते.

2) वर्तमानपत्रे :– वर्तमानपत्रांमधून पोलीसांच्या विरोधात नेहमीच लिहिले जाते. त्यांच्या विरोधात बऱ्याचवेळा छायाचित्रे येतात. उदा. खुर्चीत पोलीस कर्मचारी झोपलेले आहेत. परंतु या मागची कारणे न शोधता समाज त्यांच्याकडे उपरोधाने पहातो. काही वर्तमानपत्रे केवळ अतिरंजित बातम्या लिहून स्वतःचा खप वाढविण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या अतिरंजित गुन्हा घडला की त्याची बातमी विस्तृतपणे छापली जाते, परंतु पोलीसांनी खडतर मेहनत घेऊन गुन्हेगार शोधले व यशस्वी तपास केला तर ती दोन ओळींची बातमी होते.

3) गंभीर व क्लिष्ट गुन्हयांचा तपास :– अनेक वेळा काही गुन्हे व त्यांचे तपास फारच किचकट असतात. पोलीसांसाठी प्रत्येक गुन्हा नविनच असतो. तक्रारदार व गुन्हेगार दोन्हीही नवखेच असतात. कोण खरा तक्रारदार व कोण खरा गुन्हेगार इथपासून तर अगदी तो गुन्हा कसा घडला, कोठे घडला, कधी घडला व इतर अनेक प्रश्नांची उत्तरे पोलीसांना बारकाईने शोधावी लागतात. यात त्या लोकांचे सहकार्य, सत्यता, हस्तक्षेप या सर्व गोष्टीही महत्वाच्या आहेत.

त्यामुळे अशा अनोळखी माणसांच्या गुन्हयांचा तपास करणे ही गोष्ट म्हणावी तेवढी सोपी नसते. कधी कधी या किचकट गुन्हयांचा शोध लावतांना पोलीसांचे प्रामाणिक प्रयत्नही अपुरे पडतात. बऱ्याचवेळा पोलीसांसमोर सत्य बाहेर येत नाही. त्यामुळे तपास पुर्ण होणे अवघड होते किंवा जास्त वेळ लागतो परंतु याचा सर्व दोष पोलीसांनाच दिला जातो.

4) कायद्यातील पळवाटा :– गुन्हेगारावर आरोपपत्र दाखल होऊनही बऱ्याचवेळा कायद्यातील पळवाटांचा व तांत्रिक दोषांचा फायदा आरोपीला मिळतो, त्याचाही दोष पोलीसांवरच ठेवला जातो.

5) अदखलपात्र ;छब्द्ध व दखलपात्र गुन्हयातील मुलभूत फरक :– 95 लोकांना हा फरक माहित नसल्याने किरकोळ गुन्हयांमध्ये देखील पोलीसांनी दखल घ्यावी अशी अपेक्षा प्रत्येक तक्रारदाराची असते. चारचौघांमध्ये सार्वजनिक ठिकाणी एखाद्या इसमाने दुसऱ्या इसमाच्या थोबाडीत मारली तर त्यास अपमानास्पद वाटून त्याचा अहंकार दुखावला जातो. पोलीसांकडे तक्रार नोंदविण्यासाठी गेल्यावर पोलीस मात्र अदखलपात्र ;छब्द्ध नोंदवून घेतात व त्यास न्यायालयाकडे तक्रार देण्यास सांगतात. एवढा मोठा अपमान होऊनही पोलीसांकडून कोणतीही कारवाई केली गेली नसल्याने पोलीसांनी आरोपीकडून पैसे खाऊन प्रकरण दाबून टाकले असा सर्रास निष्कर्ष लोक काढतात. जळगांव जिल्हयातील रावेर तालुक्यातील प्रकरण अत्यंक बोलके आहे. शेतीच्या वादातून शेजारच्या शेतकऱ्याने दोन एकर केळीच्या बागेतील केळीचे घड तोडून जमिनीवर टाकले व तक्रार देण्यास पोलीस स्टेशनला गेला. पोलीसांनी एन.सी. नोंदवून न्यायालयात दाद मागण्याच्या सुचना त्यास दिल्या असता पोलीसांनी एवढया मोठया गंभीर प्रकारची दखल घेतली नाही. आरोपींना ते मिळालेले आहेत असा निष्कर्ष काढून मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रार केली गेली व वर्तमानपत्रातून खमंग बातम्या देऊन पोलीसांची बदनामी केली गेली. कायदेशीर पाहता पोलीसांचे वर्तन कायद्यास धरुनच होते. परंतु समाजामध्ये पोलीसांनी भ्रष्टाचार केला असावा म्हणूनच केळीच्या बागायतदाराला मदत झाली नाही असा गैरसमज पसरला. त्यामुळे कठीण प्रसंगी पोलीसांना सहकार्य करण्याची भावना समाजातून नष्ट होत चालली आहे.

6) संशयाचा फायदा व न्यायप्रक्रिया :– न्यायप्रणालीवर शक्यतो कोणी टिका करीत नाही, कधी कधी न्यायालयात 15–20 वर्षे केसेस चालतात. तोपर्यंत साक्षीदार मिळत नाही किंवा साक्षीदार आपली साक्ष फिरवितात. अनेक महत्वपुर्ण बाबी स्मरणात राहत नाही. त्यामुळे संशयाचा फायदा देऊन गुन्हेगारांवर मेहरबानी होते त्यासाठीही पोलीसांनाच जबाबदार ठरविले जाते.

7) कायद्याच्या मर्यादा :– पोलीसांकडे येणारे दोन गट असतात. तक्रारदार व आरोपी. तक्रारदारांच्या पोलीसांकडून खूप अपेक्षा असतात. पण कायद्याच्या बंधनामुळे त्या पुर्ण करता येत नाहीत. त्यामुळे त्यांचा रोष पत्करावा लागतो. तसेच आरोपी पक्ष आपली चूक मान्य करीत नाही व पोलीसांवर दडपण आणण्याचा प्रयत्न करतो. सरळ साध्या भाषेत विचारुन कोणीही आरोपी आपला गुन्हा कबुल करीत नाही. त्यामुळे पोलीसांना सत्य वधवून घेण्यासाठी त्यांची मारपिटाई करावी लागते. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा खराब होते. मानवी हक्क आयोगामुळे पोलीसांवर खूप बंधने आलेली आहेत.

8) राजकारणी लोकांचा हस्तक्षेप :– पोलीस दलाचे प्रमुख गृहमंत्री हे कुठल्यातरी राजकीय पक्षाचे नेते असतात. त्यामुळे त्यांच्या पक्षांशी संबंधित व स्वतःच्याच पक्षाची निश्चित बाजू घेऊन ते पोलीसांवर कळत–नकळत दडपण आणतात. त्यामुळे विरोधी पक्ष पोलीसांवर नाराज होतात. त्यांच्यावर अनाठायी टिका करतात, त्यामुळे पोलीसांची प्रतिमा अधिक डागळली जाते. सत्ताधारी पक्षांच्या

कार्यकर्त्यांना मोकळे रान मिळते असा समाजाचा ग्रह करुन दिला जातो. राजकीय अवाजवी दबावाला अनेक अधिकारी व कर्मचारी बळी पडतात. त्याचा परिणाम समाजातील नितीमुल्ये व सामाजिक बंधनांच्या उल्लंघनात होतो. समाजाच्या मुल्यांचा ऱ्हास त्यामुळे होतो व परिणामी सामाजिक स्वास्थ बिघडते.

9) बाल गुन्हेगारी निर्मुलन :– बाल गुन्हेगारांकडून गुन्हा वदवून घेतांना कमी वयामुळे पोलीसांना मर्यादा येतात व तसा प्रयत्न केल्यास त्यांना नावे ठेवली जातात.

10) गुन्हेगार व समाजकंटकांशी संपर्क :– समाजातील काही समाजकंटक (ब्लॅक मेलर्स), काळे धंदेवाले यांचेवर कार्यवाही करतांना संपर्कात आल्याने पोलीस प्रतिमा मलिन होते. अशा लोकांच्या संपर्कात आल्याने पोलीसांच्या वर्तनावर वाईट गुणांचा प्रभाव पडतो.

11) शैक्षणिक पात्रता :– पोलीस शिपायांच्या कमी शिक्षणामुळे समाजातील लोकांच्या त्यांच्या कामावर नक्कीच परिणाम होतो.

12) भ्रष्टाचार :– काही पोलीसांच्या भ्रष्टाचारामुळे पोलीस खात्याची प्रतिमा खराब होते. त्याचा परिणाम समाजावर होतो. पोलीसांना असहकार्य करण्याचे प्रमाण वाढते.

13) जातीय दृष्टीकोन :– आपल्या जातीचे मंत्री म्हणून सहकार्य करणे नाहीतर विरोध करणे, त्यांच्या विरोधात वाईट बोलणे. हा वाईट प्रघात समाजात रुजू लागला आहे. आपल्या जातीच्या लोकांना सहकार्य करणे, आपल्या जातीतील लोकांना मदत व्हावी म्हणून तपासात दिरंगाई करणे इत्यादीमुळे पोलीस प्रतिमा मलिन होते.

14) अपुरे पोलीस दल :– वाढत्या लोकसंख्येबरोबर गुन्हेगारीचे व गुन्हेगारांचे प्रमाण वाढत चालले आहे. परंतु त्यामानाने पोलीसांच्या संख्येत वाढ नाही. त्यामुळे पोलीस बळ हे अपुरे पडत आहे. त्याचा परिणाम पोलीसांच्या कार्यक्षमतेवर होत आहे. पोलीसांवरील ताण वाढत चालला आहे. अकार्यक्षम म्हणून जनतेकडून पोलीस प्रतिमेला येथेही धक्का बसतो.

15) आर्थिक फायदयाचा अभाव :– पोलीसांकडून समाजाला तसा काही आर्थिक फायदा होत नाही. उदा. विक्रिकर, उत्पन्न कर, राज्य विद्युत महामंडळ, दूरध्वनी केंद्र या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे लागेबांधे जपले की, (मॅनेज केले की) लोकांचा पैसा वाचतो, परंतु तसा फायदा पोलीसांमुळे होत नाही, त्यामुळे त्यांच्या विरोधात बोलण्याचा तक्रारदार आरोपीचा व समाजाचा कल असतो.

16) प्रोत्साहनाचा अभाव :– पोलीसांच्या चांगल्या कामगिरीबद्दल बहुधा त्यांना धन्यवाद देण्यास कोणी पुढे येत नाही. पोलीसांना कधीही जनतेकडून प्रोत्साहन तर मिळतच नाही उलट बऱ्याचवेळा टिकेलाच सामोरे जावे लागते. यास पोलीसांना प्रत्युत्तर देता येत नाही.

17) कौटुंबिक अडचणी :– लोकांच्या जिवीत व मालमत्तेच्या संरक्षणाची जबाबदारी पोलीसांवर टाकलेली असल्याने त्यांचेशी निगडीत असलेले प्रत्येक काम अत्यावश्यक ;म्उमतहमदबलद्ध सेवेत मोडते. पोलीसांच्या कामाचे स्वरुप म्हणजे त्यांना कोणत्याही वेळेचे नियोजन करता येत नाही. बाकी लोकांची कामाचे तास नियमित ठरलेले असतात. त्यामुळे कामाव्यतिरिक्तचा वेळ ते लोक तणावविरहीत आपल्या कुटुंबियांबरोबर अथवा काही वैयक्तिक कामे करण्यासाठी घालवितात. मनोरंजनासाठी काही वेळ घालवू शकतात. (उदा. चित्रपट पहाणे, खरेदी करणे, मुलांचा अभ्यास घेणे, सहलीला जाणे इ.) पोलीसांना असे कामाचे वेळापत्रक नसल्यामुळे केव्हाही तात्काळ (इर्मजन्सी) डयुटीवर हजर व्हावे लागत असल्यामुळे त्यांचे जीवन तणावयुक्त होऊन बसते. नातेवाईकांची लग्ने, सभारंभ, धार्मिक विधी, आईवडिलांचे आजारपण या महत्वाच्या बाबींना वेळ देता येत नसल्यामुळे समाजातूनही पोलीसांना चांगले स्थान मिळत नाही. कौटुंबिक रोषास त्यास बळी पडावे लागते.

18) लोकसंख्या वाढीमुळे :–

वाढती शहरीकरण – जागेची टंचाई – पाणी टंचाई – वीज टंचाई

मुलभूत सुविधांचा अभाव
↓
आंदोलने, हिंसाचार, गुन्हेगारी, दंगल
↓
पोलीसांवर पडणारा ताण, यातून जर काही अघटित घडेल तर पोलीसांनाच जबाबदार धरले जाते
↓
त्यामुळे पोलीसांची प्रतिमा खराब होते

19) प्रशासकीय अकार्यक्षमता :–

इतर विभागातील (सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पाटबंधारे खाते) यांची अकार्यक्षमता. उदाहरणार्थ

वीज पुरवठा, पाणी पुरवठा जातीचे आरक्षणे → आंदोलने, रास्ता रोको

खराब रस्ते → अपघात (ॲक्सीडेंट) → पोलीसांना धारेवर धरणे

ऊसाला कमी भाव कांद्याला कमी भाव → शेतकरी आंदोलने

20) शासकीय धोरणे :

कापसाला, ऊसाला, काद्याला कमी भाव देणे, परराज्यात कापूस नेण्यासाठी बंदी,
↓
होणारी आंदोलने
↓
त्याने पडणारा पोलीसांवर ताण

21) नियोजनाचा अभाव :

पोलीस प्रशासनमध्ये नियोजनाचा अभाव आहे, बाहेरील देशात जसे इंग्लंड, युरोप या ठिकाणी पुढील अनेक वर्षानंतर काय परिस्थिती असेल याचा विचार करुन नियोजन केलेले असते. भविष्याचे नियोजन करुन योजना आखल्या जताता. आपल्या या नियोजनाचा अभाव आहे.

22) आयोग नेमणे ; अंमलबजावणी बाबत उदासिनता

अंमलबजावणी बाबत उरासिनता (उदा. श्रीकृष्ण आयोग) वेगवेगळे आयोग नेमले जातात परंतु त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत शासन उदासिन असते.

पोलीसांच्या कामाचे स्वरुप, कामाची वेळ, अपुरे कर्मचारी वर्ग यांचा सर्व बाजुने विचार केला तर त्यांचा पगार फारच कमी वाटतो. त्यामुळे मानसिक समस्यांबरोबर त्यांना आर्थिक समस्येचा सुध्दा सामना करावा लागतो.

त्यांना बऱ्यांचदा मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागते. उदा. मुंबईमध्ये 60 टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे नाहीत. त्यामुळे त्यांना झोपडपट्टीत रहावे लागते. त्यांच्या कामाया

ठिकाणापासून दूर रहावे लागते. कधी कधी कुटुंबापासून दूर रहावे लागते. त्याचा परिणाम त्यांच्या सर्व मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक घटकारवर होतो. या व इतर कारणांमुळे पोलीस व्यसनाधिन होतात व त्यामुळे त्यांची प्रतिमा काळवंडली जाते.

राजकारणाचा पोलीस प्रतिमेवर होणारा परिणाम

1) बदल्यांचे राजकारण :

पोलीस दलाचे प्रमुख हे कुठल्यातरी पक्षाचे सदस्य/नेते असतात. त्यामुळे एखद्या गावात एखादा पोलीस अधिकारी पाहिजे असेल तर त्या पक्षाचे स्थानिक नेते गृहमंत्र्यांना पटवून त्या पोलीस अधिकाऱ्यांची त्या गावासाठी तालुका अथवा जिल्हयासाठी शिफारस करु शकतात, एकदा का त्या अधिकाऱ्याची बदली/नेमणूक त्या ठिकाणी झाली की, तो अधिकारी त्याच लोकांची (त्याच्या बदलीसाठी प्रयत्न करणाऱ्या) म्हणजेच त्याच पक्षाच्या बाजून काम करतो. त्यामुळे विरोधी किंवा दुसऱ्या पक्षाचे लोक त्या अधिकाऱ्याच्या विरोधात जातात. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांची प्रतिमा मलीन होते.

2) जातीचे राजकारण :

गृहमंत्री ज्या जातीचे, त्या जातीचे अधिकारी तेथे आपली शिफारस करुन आपल्याला हव्या त्या सोयीस्कर ठिकाणी बदली करुन घेतात. गृहमंत्र्यांची बहुदा आपल्या जातीच्या / स्वजातीय अधिकाऱ्यांवर मेहरनजर असतेच त्यामुळे बाकीचे अधिकारी नाराज होतात व वातावरण कलुषित होते.

3) स्थानिक राजकीय दबाव :

बऱ्याचदा स्थानिक राजकीय नेत्याकडून दादागिरी, गुंडागर्दी किंवा एखादा गुन्हा झाल्यास पोलीसांवर ते राजकीय दबाव आणतात. पोलीसांना शिव्या देतात, बदलीची धमकी देतात, स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये बदनामी करतात. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा तर खराब होतेच परंतु त्यांचे मनोबलही खचु शकते.

4) गुन्हेगारांना काबूत ठेवण्यासाठी तुरुंगात पोलीसांनी बळाचा वापर केल्यास त्याची अतिरंजित बातमी येते. त्यामुळे पोलीसांविरुध्द वाईट मत होते. पोलीस म्हणजे गुरा–ढोरांप्रमाणे माणसांना मारणारे क्रुरलोक असतात असे समाजाला वाटते. परंतु त्यामागची पाद्वभूमी जनतेला माहित नसते. पोलीस म्हणजे बेदम मारहाण करणारे, तुरुंगात सडविणारे अशीच प्रतिमा निर्माण होते.

5) अदखलपात्र गुन्हयाबाबत गैरसमज :

बहूतेक वेळा तक्रारदारांची अशी अपेक्षा असते की, पोलीसांनी ज्यांच्यावर आरोप आहे किंवा ज्यांच्या विरोधात तक्रार आहे त्या लोकांना सजा करावी परंतु काही गुन्हे दखलपात्र असतात तर काही अदखलपात्र असतात. काही गुन्हयांमध्ये कायद्याच्या अटी, बंधने असतात. त्यामुळे पोलीसांचेही हात कायद्याने बांधलेले असतात. त्यांच्यावर काही मर्यादा येतात. त्यामुळे ते आरोपीला तक्रारदारांच्या अपेक्षेप्रमाणे मारपिटाई करणे किंवा गुन्हा दाखल करु शकत नाहीत, परंतू याचा दोष (तक्रारदारांकडून) पोलीसांना सहन करावा लागतो. नेते मंडळी कार्यकर्ते, समाज यांच्याकडून पोलीसांची अवहेलनाच होते.

6) व्यासपीठाचा अभाव :

पोलीसांची प्रतिमा मलीन होण्यामागे असेही महत्वाचे कारण आहे की, पोलीसच आपली प्रतिमा उंचविण्यास असमर्थ आहेत कारण प्रसिध्दी माध्यमांचे सहकार्य मिळवायचे झाल्यास त्यांच्याकडे कोणताही आर्थिक फंड अथवा तरतूद नाही. वर्तमानपत्रे, टि.व्हि. चॅनल्स व मिडीया यांच्या कृपादृष्टीवर पोलिसांना अवलंबून रहावे लागते. त्यामुळे पोलीस कार्याची दखल योग्य रितीने घेतली जात नाही व समाजासमोर पोलिसांची खरी प्रतिमा येत नाही. त्यांना आपली प्रतिमा उंचविण्यासाठी काही प्रयत्न करता आले नाहीत. चांगल्या कामांची प्रसिध्दी (च्तवरमबजपवद व ळिववक ॅवता) करता येत नाही.त्यामुळे समाजात जनजागृती होत नाही. नेहमी समाजापुढे एकच बाजु आल्यामूळे पोलीसांकडे नकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले जाते. पोलीस खात्याला असे स्वतःची बाजू माडण्यासाठी कोणतेही कायदेशीर व्यासपीठ नाही, जाहिरात करता येत नाही.

पोलीस प्रशासनाची प्रतिमा बांधणी करणरी साधने व उपाययोजना(Image Building)

पोलीस प्रशासनाची प्रतिमा सुधारण्यासाठी उपाय योजना करणे.

पोलीस प्रशासन ही समाजातील व समाजासाठी फार महत्वाची संस्था आहे. समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे, कायद्याचे रक्षण करण्याचे काम हे प्रशासन करीत असते. पोलीस प्रशासन जेवढे कार्यक्षम तेवढेच समाजात शांतता, सुव्यवस्था चांगली, परंतु त्यासाठी समाजाचे सहकार्य व बाकी कारणीभुत गोष्टी (उदा. राजकारण) यांची भूमिका सुध्दा महत्त्वाची आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुन खराब झालेली पोलीस प्रतिमा सुधारण्यासाठी उपाययोजना करणे, कारण सामाजिक आरोग्य जपणारा महत्वाचा घटक म्हणजे पोलीस आहे.

1) सामाजिक प्रबोधन :

नितिमुल्यांचा अभाव, व्सनाधिनता यामुळे गुन्हे वाढून पोलीसांच्या कारवाईमुळे प्रतिमा मलिन होते. गुन्हे नियंत्रित रहावे म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी व शासन / गृहमंत्रालय यांच्याकडून येणाऱ्या दबावामुळे मोकळेपणाने गुन्हे नोंदवून घेतले जात नाहीत. त्यामुळे पोलीसांविरुध्द लोक नाराज होतात. समाजशास्त्राच्या नियमाप्रमाणे दरवर्षी लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात गुन्हे वाढणे नैसर्गिक किंवा अपेक्षित आहे. परंतु गुन्ह्याच्या नोंदी न घेता फक्त कागदोपत्री गुन्ह्यांमध्ये घट दाखविणे हे पोलीस प्रतिमेला घातक आहे.

2) सकारात्मक जाहिराती करणे :

वर्तमानपत्रामधून लेख देऊन समाजात जागृती करणे. पोलीसांच्या कामाची माहिती पेपरमधून जनतेपर्यंत नेऊन पोहचविणे. शक्यतो खून, मारामाऱ्या, चोरी, दरोडे व इतर गुन्ह्याची माहिती / बातमी गुन्हा घडल्यावर लगेच पेपरमध्ये येते. परंतु त्याचा योग्य तपास चालू असल्यास व योग्य निर्णय लागल्यास, न्याय मिळाल्यास वर्तमानपत्रामध्ये ती बातमी अनेक वेळा येत नाही. त्यामुळे पोलीसांनी किंवा समाजाने या गोष्टी लोकांच्या निदर्शनास आणून दिल्या तर नक्कीच पोलीस प्रतिमा उंचविण्यास मदत होईल.

3) प्रसार माध्यमे :– दूरदर्शन, रेडीयो या माध्यमातूनही जाहिराती करुन काही मुलाखती, व्याख्याने, लघुनाटये आयोजित करुन पोलिसांकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होण्यास मदत होईल.

4) प्रसिध्दी माध्यमे :– काही वेळा पत्रके छापून, सार्वजनिक ठिकाणी पत्रके वाटून चिटकवून गणेशोत्सव, देवी उत्सव, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी या सारख्या दिवशी व्याख्यानमाला आयोजित करुन, योग्य प्रसिध्दी करता येवू शकते त्यामुळे नक्कीच प्रतिमा उंचावण्यास फायदा होऊ शकतो.

पोलीसांबद्दल लोकांमध्ये विद्वास निर्माण होण्यासाठी या वरील गोष्टींचा उपयोग होऊ शकतो. पोलीस म्हणजे खकी वर्दीतला आपला मित्र अशी भावना लोकांमध्ये निर्माण होणे समाज हितावह आहे.

5) कार्यशाळांचे आयोजन :– काही वेळा जनतेच्या मदतीने काही सेमिनार, काही कार्यशाळा, वेगवेगळया विषयावर आयोजित करणे. उदा. भ्रष्टाचार निर्मुलन, आपला शेजारी आपला पहारेकरी, (च्तमअमदजपवद पे इमजजमत जींद बनतम) स्वसंरक्षणासाठी काही मुलभूत सूचना, पोलीस व नागरिकांमध्ये विद्वासात्मक सहकार्याची भावना निर्माण्ध करणे, संकटात किंवा हल्ला झाल्यास, चोरी झाल्यास सामना / प्रतिकार कसा करावा?गावाला जाताना घराच्या सुरक्षिततेसाठी दक्षता कशी घ्यावी. अगदी स्वसंरक्षणासाठी घराच्या कुलुपासून / दारापासून जागृती करणे आवश्यक झाले आहे.

या व अशा अनेक प्रकारच्या जागृतीमुळे लोकांमध्येही जागृती होवून स्वसंरक्षणाची जाणीव, संरक्षणाचा मक्ता फक्त

पोलीसांचाच नाही तर प्रत्येक नागरीकांचा आहे याची जाणीव होईल व सहकार्याची भावना वाढीस लागेल.

6) पोलीसांनी राजकारणाशी व राजकारणी लोकांशी मर्यादित संबंध ठेवावा :–

राजकारणी लोकांशी संबंध वाढविल्यामुळे कळत नकळत नाजकारणी लोकांचा हस्तक्षेप वाढतो व पोलीसांच्या कारभारात ढवळाढवळ होते.

पोलीसांनी नेहमी कर्तव्यदक्ष रहावे पण त्याचबरोबर नेहमी धर्मनिरपेक्ष, गरीब – श्रीमंत भेदभाव न करता, जातीयवाद न करता सर्वांना समानतेने व कायदेशीर वागणूक द्यावी. कायदा आणि राज्यघटनेतील तरतुदींच्या मर्यादेत आपले कर्तव्य असावे.

राजकीय पक्षाच्या लोकांनी दडपण आणण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना सत्य काय आहे ते पटवून देऊन, जर विरोधी काम केल्यसा त्यांचा त्यांच्यावर व पोलीस दलावर सुध्दा कसा दुष्परिणाम होईल हे अतिशय कौशल्यपूर्ण पटवून देता आले पाहिजे. जेणेकरुन राजकीय पक्षही नाराज होणार नाही व दुसऱ्या लोकांवरही अन्याय होणार नाही. अशा प्रकारचे कौशल्य, समयसुचकता, निर्णयक्षमता पोलीस अधिकाऱ्यांच्या अंगी असावी, त्यासाठी राज्य शासनाने पोलीस दलाने ठराविक दिवसांनतर / महिन्यांनंतर कार्यशाळा ठेवणे गरजेचे.

7) समानतेची वागणूक :

सर्व समाजातील वर्गाला जातीभेद, धर्मभेद न करता समानतेच्या वागणुकीमुळे पोलीस प्रतिमा उंचावू शकते.

8) नेतृत्त्व गुण व कौशल्य :

पोलीस ऑफीसर हा चारित्र्यवान, प्रामाणिक, जबाबदारीची जाणीव असलेला असावा. त्याचे व्यक्तीमत्व रुबाबदार असावे. त्यांच्या कामात / कर्तव्यात सचोटी व कळकळीची भावना असावी. त्यांच्यामध्ये योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता असावी. योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यामुळे बरेचसे प्रश्न सुटतात. (उदा. एखद्या ठिकाणी रास्ता रोको, मोर्चा किंवा दंगल अशा प्रकारच्या समस्या येतात. समोर बऱ्याच लोकांचा जमाव असतो. जमावाची मानसिकता अतिशय भयानक असते. अशा जमावाला अतिशय विचारपुर्वक कौशल्याने समजावून घ्यावे लागते. किवा समजावून सांगावे लागते व समोरचा प्रश्न संयमाने हाताळावा लागतो, आणि असे जमले नाहीतर, कदाचित जमाव चिघळून दगडफेक, चेंगराचेंगरी, जाळपोळ, दंगल होऊ शकते. त्यामध्ये मनुष्यहानी, मृत्यू,समाजहानी, वित्तहानी, दुकाने फोडणे, बस जाळणे, खून असे प्रकार होऊ शकतात. त्यांना शमविण्यासाठी अश्रुधुर व प्रसंगी गोळीबार करावा लागतो. त्यामुळे मनुष्यहानी (मृत्यूमुखी पडण्याची) होण्याची शक्यता वाढून त्या छोटयाशा मोर्च्यास (आंदोलनास) वेगळेच वळण लागते व प्रकरण आणखीच चिघळते. त्यातच पुढे राजकारण, जातीयवाद यांचा शिरकाव होतो. गृहमंत्रालयापर्यंत याची व्याप्ती वाढते. परिणाम असा होतो की, प्रत्येकजण आपली चामडी वाचविण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याला बळीचा बकरा ठरवितात. त्यातची त्याची चौकशी, निलंबन या गोष्टी घडतात. या सर्व प्रकरणाला पोलीसांनाच जबाबदार धरले जाते, व त्यामुळे पोलीस प्रतिमा पुन्हा मलीन होते. त्यामुळे योग्य निर्णयक्षमता व कौशल्यपुर्वक प्रकरणांची हाताळणी या गोष्टी पोलीस अधिकाऱ्यांच्या अंगी असाव्या लागतात.

9) महिलांची गस्ती :

महिला पोलीसांचा रोल पण महत्वाचा असावा. त्याची गस्ती वाढवावी. त्यामुळे समाजातील महिलांना सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, विश्वास निर्माण होईल व प्रतिमा उंचविण्यास मदत होईल

10) महिलांची पोलीस भरती करणे.

11) कायद्याच्या चौकटीत निर्वाण न घेता नैतिकता पाळणे

12) चारित्र्य उंचावणे

13) राजकारण व पोलीस प्रशासन यांच्यात विभागणी करणे.

14) निरपेक्ष, पारदर्शक पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांची भरती करणे.

15) पोलीस शिपायापासून अधिकाऱ्यांपर्यंत नैपुण्यासाठी मानसिकता बदलण्यासाठी नियमित प्रशिक्षण देणे.

16) पोलीसांवरील ताण कमी करणे, गुणवत्ता वाढविण्यासाठी जगातील विकसित देशाचे प्रमाणबध्दता (लोकसंख्या : पोलीस संख्या) यांचा विचार करुन पोलीसबळ वाढविणे. (उदा. लंडनमध्ये 50 : 1 तर मुंबईमध्ये 400 : 1 असे अंदाजे प्रमाण आहे.

17) गुन्हे उघडकीस आणतांना / तपासकार्यात सत्यशोधनासाठी नविन आधुनिक तंत्राचा वापर कराणे. (उदा. लाय डिटेक्टर, ब्रेन मॅपींग, नार्को ॲनालिसीस, आधुनिक रासायनिक विश्लेषण, प्रयोगशाळा निर्माण करणे.)

18) गस्त वाढविण्यासाठी पोलीसबळ व वाहनांचा पुरेसा वापर करणे.

19) ILO जेमवतल चा वापर (International Labour Organistion) कामाचे तास प्रमाण,ॅजंदकंतक तंजपदह, भत्ते ठरलेले असतात.

20) स्वायत्त संस्था (Autonomous Body) – पोलीस प्रशासन हे स्वायत्त संस्था व्हावे. उदा. न्यायसंस्थेत बाकीचे घटक हस्तक्षेप करीत नाहीत. त्यामुळे शिस्तबध्द व पारदर्शक कामकाज चालते. त्याप्रमाणात पोलीस प्रशासन हवे.

21) नागरीकांना कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांची जाणीव करुन देण्यासाठी व कायद्याविषयी ज्ञान देण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. कायद्याच्या ज्ञानाबद्दल अज्ञान हा सर्वात मोठा अभाव आहे.

22) नागरीकांची बेपर्वाही कायद्याचे पालन करण्यापेक्षा कायदे तोडण्याकडे लोकांचा जास्त कल (भर) असतो. त्यामुळे नाईलाजास्तव पोलीसांना कारवाई करावी लागते. त्यामुळे जनतेचा रोष पत्कारावा लागतो. (उदा.सिग्नल तोडणे, गाडीची कागदपत्र नसणे, वाहनपरवाना नसणे वगैरे) नागरीकांची पोलीसांबाबतीतील उदासिनता दूर करणे.

भारतामध्ये 2000 पेक्षा जास्त कायदे आहेत पण सर्वसामान्य नागरीकांना त्याबद्दल अज्ञान, उदासिनता आहे.

23) आधुनिक कल्याणकारी चौकटीत राहून पोलीस प्रशासन स्वतःच आपली प्रतिमा सुधारु शकते.

24) पोलीसांनी राजकारणापासून दूर/अलिप्त राहिले तर पोलीस प्रतिमा सुधारु शकते.

25) पोलीसांनी आर्थिक हितसंबंधापासून (भ्रष्टाचारापासून) दूर ाहिले तर प्रतिमा सुधारु शकते.

26) पोलीस प्रशासनाचा मुख्य गाभा गुन्हयाचा तपास करुन सत्य शोधणे, कायदा व सुव्यवस्था जपणे हा आहे – हाच पाहिजे, ही चौकट मोडली तर त्याची प्रतिमा मलिन होते.

संदर्भ सुची

1) गुन्हे तपास, (B.P.R.D.) मॅन्युअल, नवी दिल्ली

2) बी.पी.आर.डी. 2010, पोलीस विज्ञान (बी.पी.आर.डी. प्रकाशन)

3) मल्लिक बी.एन. 1977, नागरी अशांतता (मुंबई, शासकीय मध्यवर्ती प्रकाशन)

4) सामरा ए.एस. 1982, आधुनिक भारतात पोलीस आणि त्यांचे व्यवस्थापन यांची भुमिका (पुणे, पोलीस सेवा प्रकाशन)

5) पोलीस महासंचालक महाराष्ट्र शासन, 1999, पोलीस मॅन्युअल भाग–3 अधिकार व कर्तव्ये (मराठी आवृत्ती)

6) शाह गिरीराज, हिस्ट्री ॲन्ड ऑर्गनायझेशन ऑफ इंडियन पोलीस (नवी दिल्लीःअनमोल प्रकाशन 1991) पृ.7 ते 11, 15 ते 28

7) बक्खी पी.एम. (2001) दी कॉन्टीटयुशन ऑफ इंडिया पृ.–253
8) राघवन आर.के. 22 एप्रिल 2011 (माजी सी.बी.आय. महासंचालक) Investigators Plight (Frontline Magazine)
9) प्रा.शिल्पा कुलकर्णी 2007, गुन्हा आणि समाज (डायमंड पब्लिकेशन्स, पुणे) पृ.1 ते 26, 67 ते 86
10) NCRB Gazette, January- March 2001, vol- XIII
11½ Krishnamurthy S. 2001, Preparing the Indian Police for the 21st Century (Bangalore, Puliani and Publiani)
12) R.Deb, Police & Law Enforcement
13) Sen Sankar , 1994, The Hand book for Trainers (Hyderabad, Boys town ITC offset press Jahanuma)
14) Clarke, R. (1992), Situational Crime Prevention. New York, Harrow & Heston.
15) Jordan, P. (1998).¨Effective policing strategies for reducing crime[1].